**<u>ठळक बातम्या</u>**

- गुजरातमधे बडोदा जिल्ह्यात पूल कोसळून झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू, प्रधानमंत्री तसंच गुजरात राज्य सरकारकडून आर्थिक मदतीची घोषणा

- राज्यभरातल्या हजारो शिक्षकांचं मुंबईत आंदोलन, मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन तोडगा काढण्याचं शिक्षण मंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन

- विदर्भात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती / नागपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी, मदत आणि बचावकार्य सुरू असल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती

**आणि**

- स्पेनमध्ये झालेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या शेवटच्या टप्प्यात भारताला अव्वल स्थान

**<><><><><>**

गुजरातमध्ये बडोदा जिल्ह्यात पदर इथं आज पहाटे पुलाचा काही भाग महिसागर नदीत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. आणंद आणि बडोदा जिल्ह्यांना जोडणारा हा पूल होता.

अपघात झाल्यानंतर बडोदा जिल्हा प्रशासनानं तातडीनं बचावकार्य हाती घेतलं असून, स्थानिक नागरिकही त्यांना मदत करत आहेत. आणंद इथून अग्निशमन दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. वाहनांची वाहतूक सुरू असताना हा पूल कोसळला. त्यामुळे अनेक वाहने पाण्यात वाहून गेली. बचावकार्य युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती बडोदाचे जिल्हाधिकारी अनिल धमोलिया यांनी दिली. दरम्यान, NDRF ची पथक अपघातस्थळी दाखल

झाले असून ते देखील मदतकार्यात सहभागी झाले आहेत. हा पूल नेमका कशामुळे कोसळला याचा तपास करण्यासाठी गुजरात सरकारनं तांत्रिक तज्ज्ञांच्या समितीची नियुक्ती केली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्रधानमंत्र्यांनी या दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे. गुजरात राज्य सरकारने मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी चार लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

राज्यभरातील सुमारे सहा हजार अंशत: अनुदानित शाळांना अनुदान मिळावे, यासाठी गेल्या चार दिवसांपासून विनाअनुदानित शिक्षक आक्रमक झाले आहेत. मुंबईच्या आझाद मैदानात हजारो शिक्षक एकत्र आले असून त्यांनी आंदोलन सुरू केले. अनुदान मिळेपर्यंत मैदान सोडणार नाही, असा त्यांचा निर्धार आहे. राज्य सरकारने या शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, अद्याप निधीची तरतूद न केल्याने हे आंदोलन सुरू आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज या आंदोलकांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दिला आहे. शिक्षकांवर संघर्ष करण्याची वेळ येणं हे महाराष्ट्रासाठी अशोभनीय आहे. तुमच्या मागण्या मान्य होण्यासाठी सरकारशी संवाद साधू आणि प्रश्न सोडवून घेऊ, असं आश्वासन त्यांनी शिक्षकांना दिलं. या विषयावर मुख्यमंत्री स्तरावर चर्चा होणार असून त्यात त्यावर तोडगा काढण्यात येईल अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिली, याबाबतचा प्रश्न विजय देशमुख यांनी उपस्थित केला होता. राज्यातल्या अल्पसंख्य शाळांचा दर्जा मिळवण्यासाठी गैरप्रकार झाल्याच्या तक्रारीनुसार एक समिती स्थापन करून राज्यव्यापी तपासणी मोहीम राबवण्यात येईल, अशी घोषणा शालेय

शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केली, याबाबतचा प्रश्न गजानन लवटे यांनी उपस्थित केला होता.

<><><><><>

विधानसभेत आज लक्षवेधी सूचनांनंतर पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरू आहे. नगरविकास, सार्वजनिक बांधकाम आणि पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाच्या पुरवणी मागण्या आज चर्चेसाठी घेण्यात आल्या आहेत. यावेळी बोलताना आमदार वरूण सरदेसाई यांनी बाकी प्रतिनिधींना दिला जाणारा निधी विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधींनाही द्यावा, अशी मागणी केली. नगरविकास विभागामार्फत सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी दिलेला निधी कमी असून, तो वाढवून किमान ५०० कोटी रुपये देण्याची मागणी आमदार देवयानी फरांदे यांनी केली. भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी मराठी माणसाबाबत केलेली विधानं मराठी माणसाचा अपमान असून, यावर भाजपाची काय भूमिका आहे, असा प्रश्न आमदार जयंत पाटील यांनी उपस्थित केला.

<><><><><>

छत्रपती संभाजी नगर इथं विद्यादीप बालसुधारगृहमधे अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाराची घटना, अतिशय गंभीर असून, या प्रकरणी जिल्हा बालविकास अधिकाऱ्याविरोधात कारवाई करत तात्काळ त्याचं निलंबन केलं जाईल, तसंच संबंधित संस्थेची मान्यता देखील रद्द करण्याचे निर्देश मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिले. आमदार चित्रा वाघ यांनी अल्प सूचना प्रश्नाद्वारे हा मुदा सभागृहात नियमित कामकाजाला सुरुवात होताच उपस्थित केला.

या बालगृहातील अल्पवयीन मुलींचा मारहाण करण्यासह अमानवी पद्धतीनं छळ चालू होता. त्यांच्यावर धर्मांतर कारण्याचाही दबाव होता, असा मुद्दा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही उपस्थित केला. या प्रकरणी चौकशी करण्यासाठी तीन

वरिष्ठ महिला पोलीस निरीक्षकांची समिती स्थापन केली असून, त्यांनी या बालगृहाला भेट दिली असून, अनेक पीडित मुलींशी चर्चा करून या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेतली आहे. उद्या ही समिती आपला अंतिम अहवाल देणार आहे. अहवाल आल्यानंतर, या प्रकरणात, सरकारी यंत्रणेतील जे कुणी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सहभागी असतील, त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं. मुंबई उच्च न्यायालयानंही अमायकस क्युरे अंतर्गत याची दखल घेत पावले उचलली आहेत, याची माहिती फडणवीस यांनी सभागृहाला दिली. मात्र राष्ट्रीय महिला आयोगानंही या प्रकरणाची दखल घेत, गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत, तरी राज्य महिला आयोग या गंभीर प्रकरणी कधी कारवाई करणार, अशी टीका दानवे यांनी केली.

**<><><><><>**

विदर्भात बहुतांश जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचून अनेक रस्ते बंद झाले आहेत तसंच नद्या आणि नाले दुथडी भरुन वाहत आहेत. वर्धा इथं यशोदा नदीला पूर आल्यानं वर्धा ते राळेगाव रस्ता बंद झाला आहे. नागपूर महानगरपालिका आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापनानं बचाव कार्य सुरू केलं आहे. नागपूर रेल्वे स्थानकात पाणी भरलं असल्यानं रेल्वे ट्रॅक पाण्याखाली गेला आहे. नरेंद्र नगर रेल्वेच्या पुलावर पाणी आल्यानं पूल वाहतुकीसाठी बंद केला आहे. शहरात अनेक भागात पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नसून पावसाचं पाणी घरात शिरत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिक करत आहे. कळमेश्वर तालुक्यात अतिवृष्टीमुळे एकाचा मृत्यू झाला आहे.

हवामान विभागानं नागपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांना हा रेड अलर्ट दिला आहे. या जिल्ह्यांमध्ये वादळीवाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर अमरावती, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये ऑरेंज अलर्ट आहे. याठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.

विदर्भात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून शासनाने बचाव आणि मदतकार्य सुरू केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. याबाबतचा प्रश्न सदस्य नाना पटोले यांनी उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले.

**होल्ड.. बाईट - मुख्यमंत्री**

**<><><><><>**

स्पेन मध्ये माद्रिद इथं झालेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या चौथ्या आणि शेवटच्या टप्प्यात भारताच्या ऋषभ यादव आणि ज्योति सुरेखा वेन्नम यांच्या कामगिरीने भारताला पहिलं स्थान मिळवून दिलं. ऋषभनं ७१६ गुणांसह, तर ज्योतीनं ७१५ गुणांसह सर्वोच्च स्थान मिळवलं.

**<><><><><>**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत आज संध्याकाळी ऑल इंग्लंड क्लबवर उपांत्यपूर्व सामने होणार आहेत. पुरुषांच्या एकेरीत इटलीचा यानिक सिनर आणि अमेरिकेचा बेन शिल्डन यांच्यात लढत होणार आहे. तर दुसऱ्या उपांत्य पूर्व फेरीत इटलीचा फ्लेव्हियो कोबोली याची लढत २४ वेळा ग्रँड स्लॅम विजेत्या नोवाक जोकोविच याच्याशी होईल.

**//<><><><><>//**